"MAHALAXMI TEMPLE"

A Project Submitted to,

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
# (AUTONOMOUS)

(स्वायत्त) कोल्हापूर

**For the Degree of Bachelor of Arts**

in

**History**

**By**

**(OMKAR MAHADEV PATIL)**

**Under the Guidance of**

**Dr. S. R. Kattimani**

Head Dept. of History, Vivekanand College, Kolhapur

**2023**

## ** अनुक्रमणिका **


| अ.क्र. | घटक | पान नं. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | |
| २. | उद्दीष्टे | |
| ३. | पूर्व संशोधनाचा आढावा | |
| ४. | संशोधन पध्दती | |
| ५. | गृहितके | |
| ६. | व्याप्ती व स्वरुप | |
| ७. | संशोधन महत्व | |
| ८. | प्रकरण -१<br>• महालक्ष्मी मंदिराचा इतिहास | |
| | प्रकरण -२<br>• धार्मिक व सांस्कृतिक परंपरा विषयी माहिती अभ्यासणे<br>• किरणोत्सव<br>• रथोत्सव | |
| | प्रकरण-३<br>• महालक्ष्मी मंदिराची वैशिष्टये अभ्यासणे. | |
| | प्रकरण-४<br>• मंदिराच्या वास्तु स्थापत्य कलेचा इतिहास अभ्यासणे. | |
| ९. | मुर्तीचे वैशिष्टये | |
| १०. | निष्कर्ष | |
| ११. | संदर्भसूची | |
| १२. | मुलाखत | |
| १३. | परिशिष्ट | |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# प्रतिज्ञापत्र

मी ..........ओंकार महादेव पाटील..........
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प ..........श्री. महालक्ष्मी टेम्पल. प्रकल्प.......... हा मी स्वतः क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे . पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही .

दिनांक: 4/5/ २०२३

विद्यार्थ्याचे सही: OPatil

ठिकाण: कोल्हापूर

विद्यार्थ्याचे नाव: ओंकार महादेव पाटील

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## •प्रस्तावना :

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी एक महत्त्वाचे पीठ म्हणून 'कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर' ओळखले जाते. महालक्ष्मीचे करवीर पीठ आधी मायेचे 'आद्यपीठ असून येथे जल रूपाने महादेव, पाषाण रूपाने विष्णू , रुक्ष रूपाने देवता व चालुक्य रूपाने मुनिजन वास्तव्य करीत आहेत असा उल्लेख प्राचीन धार्मिक ग्रंथात आढळतो. कोल्हापूरमध्ये प्राचीन काळात कोल्हासुराचे राज्य होते त्याच्या अन्यायी व जुलमी अत्याचाराला कंटाळून लोकांनी महालक्ष्मीची प्रार्थना केली त्यावेळेस महालक्ष्मी ने अवतार घेऊन कोल्हा सुराचा वध केला अशीही एक दंतकथा प्रचलित आहे हिंदू धर्मियांची काशी यात्रेस जावे अशी एक इच्छा असते या इच्छेतूनच काशीची प्रतिकृती करवीर क्षेत्र निर्माण करण्यात आले काशी या ठिकाणी भगवान विष्णू शिवाच्या रूपाने राहिले आणि करवीर येथे तो शक्तीच्या महालक्ष्मीच्या रूपाने राहिला काशी तीर्थक्षेत्राशी साम्य असलेले म्हणी मनिकरनिका कुंड काही धार्मिक क्षेत्रीय या ठिकाणी निर्माण करण्यात आली यामुळे करवीर क्षेत्रास मोठ्या प्रमाणात भाविक येतात आणि यामुळेच करवीर क्षेत्रास दक्षिण काशी असे संबोधण्यात आले संस्थान काळामध्ये विशेषता छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कला क्रीडा यांना राजश्रय मिळाला यामुळे कोल्हापूरचा सांस्कृतिक विकास होऊन यास कोल्हापूर म्हणून संबोधले जाऊ लागले या सर्वातून कोल्हापूरच्या धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाचा विकास होऊन त्यास चालना मिळाली प्रस्तुत प्रकल्पामध्ये महालक्ष्मी मंदिराचा व सांस्कृतिक पर्यटनाचा आढावा घेण्यात आला आहे .

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## •उद्दिष्टे :

☆महालक्ष्मी मंदिराचा इतिहास अभ्यासणे.

☆धार्मिक व सांस्कृतिक परंपरा विषयी माहिती अभ्यासणे.

☆महालक्ष्मी मंदिराची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

☆मंदिराच्या वास्तू स्थापत्य कलेचा इतिहास अभ्यासणे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## • पूर्व संशोधनाचा आढावा :

कोल्हापूर राज्याचा इतिहास खंडेराव शिंदे यांच्या पुस्तकातून कोल्हापूर विषयीची माहिती मिळते परंतु महालक्ष्मीच्या मंदिराचा थोडाफार इतिहास समजण्यास मदत होते.

1) माडरे सूर्यकांत कोल्हापुरी साज या पुस्तकातून कोल्हापुरातील महालक्ष्मीचे वर्णन आढळून येते.

2) मराठे नंदकुमार कोल्हापूर दर्शन या पुस्तकातून मंदिराचे महत्त्व सांगितले आहे.

3) मराठे नंदकुमार श्री महालक्ष्मी दर्शन या पुस्तकातून मंदिराची माहिती मिळते.

4) खंडेराव शिंदे कोल्हापूर राज्याचा इतिहास या पुस्तकांमध्ये कोल्हापूरचा सामाजिक, आर्थिक, राजकीय इतिहास मिळतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## •संशोधन पद्धती :

प्रस्तुत प्रकल्पामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती बरोबर दुय्यम साधनाद्वारे मी प्रकल्प पूर्ण केला आहे सदर संशोधनामध्ये मुलाखत व प्रश्नावली, वृत्तपत्र ग्रंथालयातील साधने, इंटरनेट, या साधनाद्वारे मी प्रकल्प पूर्ण केला आहे या प्रकल्पासाठी पुस्तके, मराठी विश्वकोश यांचा वापर केलेला आहे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## • गृहीतके :

1) महालक्ष्मी मंदिर हे कोल्हापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटन वास्तू म्हणून ओळखले जाते.

2) मंदिराची शैली तत्कालीन पुरण शास्त्राशी संबंधित आहे.

3) महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटनासाठी भर टाकते.


4) कोल्हापुरात महालक्ष्मीच्या रथोत्सवाचे विशेष महत्त्व आहे.

5) महालक्ष्मी मंदिरात किरणोत्सव हा नैसर्गिक रित्या साजरा केला जातो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# •व्याप्ती व स्वरूप :

आधुनिक काळात महालक्ष्मी मंदिराचे प्राप्ती व कार्य लक्षात घेण्यासाठी सदर विषयाच्या दृष्टीने मोठे योगदान आहे सदर महालक्ष्मी मंदिर या विषयासाठी मी स्थापनेपासून आढावा घेतला आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## • संशोधनाचे महत्त्व :

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटनामुळे येथे बाजारपेठेचा इतिहास नागरिकांना रोजगाराची संधी त्याचबरोबर पायाभूत सुविधांचा विकास झाला पर्यटनामुळे सामाजिक परिवर्तन, सामाजिक ऐक्य, तसे देशाची एकात्मता वाढीस कोल्हापूरच्या पर्यटनामुळे साध्य होण्यास मदत झाली. कोल्हापूरचा ऐतिहासिक ठेवा संवर्धन करण्याचे काम पर्यटनामुळे साध्य झाले आहेत त्याचबरोबर महालक्ष्मी मंदिराचा ऐतिहासिक माहितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण -1

## महालक्ष्मी मंदिराचा इतिहास:

श्री महालक्ष्मी चा उल्लेख 18 पुरानापैकी काशीखंड, पद्मपुराण देवी भागवत, हरिवंशपुराण व स्कंधपुराणातिल खंडांच्या उत्तरार्धा सापडतो सरस्वती पुरानात कोल्हापूरचा 'महापीठ'म्हणून उल्लेख केला आहे इसवी सन 109 मध्ये राजा कर्णदेव कोकणातून कोल्हापुरात आला त्यावेळेस महालक्ष्मीची मूर्ती छोट्या मंदिरात होती हा सर्व भाग आरण्याने वेढलेला होता राजा कर्ण देवाने आजूबाजूचे जंगल तोडून हे मंदिर उजेडात आणले असे मत डॉक्टर कुंदेकरांचे आहे तसेच कोल्हापूरच्या शिलाहार राजाने श्री महालक्ष्मी लब्धवर प्रसादादी राजवली विराजित अशी बिरुदी लावण्याचा उल्लेख शिलाहार राजा ' गंडरादित्य ' इसवी सन 1105 ते 1140 याच्या ताम्रपटात मिळतो पुढे बाराव्या शतकात शिला राजाने महा सरस्वती मंदिरावर महालक्ष्मी प्रदक्षिणा मार्ग बांधला इसवी सन 1218 मध्ये यादव राजवटीमध्ये तौलम याने महालक्ष्मी मंदिराचे महाद्वार बांधले. याने देवीला जडजवारीत अर्पण करून द्रव्य दिल्याचे महालक्ष्मी मंदिरातील गारेचा गणपती मंदिराच्या खांबावरील शिलालेख आढळतो इसवी सन 13 व्या शतकात कोल्हापूरमध्ये 'शंकराचार्य 'मठाची स्थापना झाली शंकराचार्याने मंदिरात चे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन या मंदिराची शिखरे, नगर खाना व कचेरीचे बांधकाम केले अशा प्रकारे विविध राजवटीमध्ये महालक्ष्मी मंदिराचा विकास होत गेला. चौदाव्या आणि पंधराव्या शतकामध्ये मुस्लिम राजवटीत देवळांची नासधूस केले त्यावेळी या देवळातील महालक्ष्मीची मूर्ती का खाजगी घरामध्ये हलवण्यात आले पुढे करवीरचे छत्रपती संभाजी दुसरे 1714 ते 1760 यांच्या अधिवेशन वरून

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

सेनापती सदोजीराव घोरपडे यांनी 26 सप्टेंबर 1715 रोजी महालक्ष्मी मंदिर मूर्तीची मंदिरात प्रतिष्ठापना केली कोल्हापूर प्रांतातील कुरड या गावचा समुद्र पट्टी अशा करांचे उत्पन्नही करवीर क्षेत्राच्या कालखंडात महालक्ष्मी देवस्थान च्या व्यवस्थित साठी देण्यात येत व्या शतकानंतर महालक्ष्मीच्या महिमे मुळे दिवसेंदिवस भक्तांमध्ये वाढ होऊन देवी महाराष्ट्रातील आद्य देवता म्हणून नावारूपाला आली देवीच्या मूर्तीवर मोठ्या प्रमाणावर अभिषेक केल्यामुळे मूर्तीची झीज होऊ लागले कुंकवामध्ये असणारे हायड्रोक्लोरिक सल्फ्युरिक ॲसिड व दह्यात असणारे नायट्रिक ॲसिड यामुळे मूर्तीच्या वालुका मय भागाची झीज होऊन मूर्तीचे मूळ रुप नष्ट होऊ लागले आहे. यामुळे महालक्ष्मीच्या मूर्तीला वज्रलेपा संबंधाची चर्चा सुरू झाली मूर्तीला धक्का लावनार या विचाराने लोकांच्या भावना दुखावल्या पण त्या वेळचे शंकराचार्य करवी संकेश्वर आचे शंकराचार्य आधी विद्वान मंडळीने शास्त्रोक्त आधार देऊन हा वाद मिटवला इसवी सन 1954 मध्य श्री शामराव सदर एकर जोशी यांच्या पौरोहित्या खाली कोल्हापूरचे छत्रपती शहाजीराजे यांच्या हस्ते मूर्तीवर वज्रलेप लावून ती पुन्हा स्थापन करण्यात आली. प्राचीन काळापासून महालक्ष्मी मंदिराचे पर्यटन दृष्ट्या खूप महत्त्व वाढत गेले आहे म्हणून आजच्या काळातील महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

## प्रकरण -2

### धार्मिक व सांस्कृतिक परंपरा विषयी माहिती अभ्यासणे .

☆महालक्ष्मीचे उत्सव : महालक्ष्मी मंदिरामध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम किंवा सण हे लोकांच्या उपस्थितीमध्ये पार पडतात म्हणून समाजामध्ये सण उत्सवांना फार मोठे महत्त्व आहे मानवाच्या जीवन प्रणाली, विचारप्रणाली, उपासना प्रणाली या तिन्हींचा संगम या सण उत्सवात दिसून येतो करून ही संस्कृती मानवी जीवनात रुजवली आहे महालक्ष्मी मंदिरामध्ये वर्षभर विविध सण उत्सव साजरे केले जातात या सण-उत्सवांमधून कोल्हापूरच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचे दर्शन घडते त्याचबरोबर महालक्ष्मीच्या धार्मिक महत्त्व मुळे वर्षभर महालक्ष्मी मंदिराला लाखो भाविक आणि पर्यटक येथे येत असतात.

☆नवरात्र उत्सव : शारदीय नवरात्र उत्सव हा देवी दुर्गा मातेच्या समानार्थ साजरा केला जाणारा एक वार्षिक हिंदु सन आहे . नवरात्र म्हणजे नवरात्रीचा समूह असा शब्दशः अर्थ होतो हा सण नवरात्री आणि दहा दिवस साजरा होतो, प्रथम चैत्र महिन्यात साजरा होतो नवरात्र ही वेगवेगळ्या कारणासाठी आणि विविध हिंदू सांस्कृतिक क्षेत्राच्या विविध भागांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो देवी दुर्गा मातेला शक्ती आणि ऊर्जेचे प्रत्येक मानलं जातं नवरात्र दुर्गेच्या सर्वांना रूपांची विविधता पूजा अर्चा केली जाते असे मानले जाते की नवरात्रीच्या पावन पर्वात देवी दुर्गेची पूजा करून घटस्थाना केल्याने मनातील सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण होतात. नवरात्रीच्या पूजेमध्ये नियमांचं विशेष महत्त्व सांगण्यात आले आहे माता दुर्गा नियम आणि खडक शिस्तीसाठी ओळखली जाणारी देवीची रूपे आहेत त्यामुळे नवरात्रीच्या

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)




उत्सवाला खूप महत्त्व आहे नवरात्रीत ललित पंचमीच्या दिवशी श्री महालक्ष्मी टेंबलाबाईच्या भेटीला जाते नवरात्र उत्सवामध्ये दररोज गरुड मंडपा समोर गायन, वादन ,कीर्तन अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते नवमी हा नवरात्रीतील अखेरचा दिवस असतो या दिवशी महालक्ष्मी मंदिरामध्ये होमहवन केले जाते विद्या विधींची सांगता तोफेच्या सलामेने होते व देवीचे नवरात्र उठते हा दिवस खंडेनवमीचा म्हणजे शास्त्र पूजेचा मानला जातो परंपरेने सर्वत्र शस्त्रशुद्ध पूजनही साजरे केले जाते. प्रतिपदेपासून नवमीपर्यंत अखंड कसबजलेला परिसर दसऱ्याच्या सोहळ्यासाठी उत्कंठ होतो व लोक मोठ्या थाटामाटाने दसरा महोत्सव साजरा करतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# किरणोत्सव:



महालक्ष्मीचे मंदिर हे दिशा साधन यंत्राने बांधलेले आहे महालक्ष्मी मंदिरामध्ये वर्षभरात अनेक धार्मिक सांस्कृतिक उत्सव साजरे केले जातात दरवर्षी जानेवारी फेब्रुवारी महिन्यात आणि नोव्हेंबर मध्ये सूर्यास्ताच्या वेळी महालक्ष्मी च्या मंदिरात बाबत एक अतिशय अद्भुत घटना अनुभवास मिळते. ती म्हणजे 31 जानेवारी आणि 9 नोव्हेंबर रोजी सूर्याची किरणे दरवाजातून प्रवेश करून थेट महालक्ष्मीच्या पायावर पडतात तरी प्रक्रिया सातत्याने तीन दिवसापर्यंत चालते या सर्व क्रियेला किरणोत्सव म्हणून ओळखले जाते 1 फेब्रुवारी आणि 10 नोव्हेंबर रोजी सूर्याची किरणे देवीच्या छातीपर्यंत पोहोचतात 2 फेब्रुवारी आणि 11 नोव्हेंबर मावळ तिच्या सूर्याची किरणे हे देवीच्या पूर्ण अंग पडतात या दिवशी मंदिरातील सर्व विद्युत दिवे पूर्णपणे बंद



VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

करण्यात येतात किरण पडल्याची खूण म्हणून घंटा नाद होतो त्यानंतर देवीची आरती केली जाते हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी होते हा सोहळा लोकांना नीट पाहता यावा म्हणून मंदिर व्यवस्थापन समिती मंदिराच्या आवारात एलईडी स्क्रीन द्वारे हा किरणोत्सव सोना पाण्यासाठी भाविकांचे सोय केली जाते. अशाप्रकारे महालक्ष्मी मंदिरामध्ये मोठ्या थाटामाटाने किरणोत्सव सोहळा पार पडला जातो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## रथोत्सव :

श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी अर्थात आंबाबाई मुख्य उत्सवा पैकी एक उत्सव म्हणजे रथोत्सवाचा दिवस होय . श्री जोतिबाच्या चैत्र यात्रेनंतर दुसऱ्या दिवशी रथोत्सव असतो जोतिबा डोंगरावरील भाविक गावी जाताना आई अंबाबाईचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये येत असतात चोपदारांच्या ललकारी नंतर देवीची उत्सव मूर्ती सनई ताशा च्या निनादात श्री पूजक रथामध्ये घेऊन येतात त्यानंतर उत्सव मूर्तीची पूजा बांधण्यात येते 9.30 वाजता तोफेच्या सलामी नंतर देवीचा रथ नगर प्रदक्षिणासाठी बाहेर पडतो रताला जिथे भाविक विनंती करतात तिथे रथ थांबून भाविकांची आरती स्वीकारली जाते. पुढे गुजरी चौका मध्ये भव्य आतिषबाजी करण्यात येते रथ नगर खाना ओलांडून भवानी मंडपात येतो या वेळीचे दुश्य हे खुप सुंदर असते करवीर भुमि मध्ये आई अंबाबाई आपल्या भक्तांच्या भेटीसाठी येत असते. पुढे रथ भवानी मंडपाच्या चौकामध्ये येतो श्रीमान महाराज छत्रपतींचा चोपदार महाराजांच्या नावाची ललकारी देतो पाठव हुजूर स्वारीच आगमन होत महाराज़ देवीच पंचोपचार पूजन करतात आरती होते आणि पुन्हा रथ मार्गस्थ होतो पुढे रथपाल गोपाल तालीम, मिरजकर तिकडे मार्गे नूतन मराठी, शाळेसमोर येतो पाठकांच्या घरासमोर रथ येताच चोपदार व रोशन नाईक रथा वरून उतरतात आणि रंकोबाच्या देवळात जातात श्रीरंक भैरव अर्थात कोल्हापूरचा कोतवाल जना अंबाबाईच्या निरोपाची वाट बघत सदरेवर बसलेला असतो महालक्ष्मीच्या चोपदारांनी ललकारी देतातच रंकोबा आपल्या देवळात जातो. पुन्हा दर्शन करून हा लवा जमा बिन खांबी गणेश मंदिराकडे जातो तिथेही अशाच पंचोपचार पूजा ललकारी होऊन चोपदार रथावर येतात. पुढे महाद्वाराच्या मुख्य मार्गावर रथ येतो. भाविकांनी काढलेल्या भव्य

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

रांगोळ्या  वरून रथ जातो काही मंडळींच्या वतीने श्री महालक्ष्मीच्या मूर्ती आरास केली जाते व पारंपारिक देवीचा फुटाणे व खडीसाखराच्या प्रसादाचे वाटप होते अखेरत प्रदक्षिणा करून महादेवाचा प्रवेश करतो कदम घराण्यातील स्त्रिया पारंपारिक मानाप्रमाणे महालक्ष्मीची दृष्ट काढतात श्री पूजक पालखी घेऊन येतात रथा वरून उतरलेली श्री महालक्ष्मी उत्सव मूर्ती पालखीत बसते परंपरेप्रमाणे अगस्तीच्या दीपमाळीला प्रदक्षिणा करून सात टप्प्यावर गायन सेवा घेऊन महालक्ष्मीची पालखी सदरेवर येते तोफीची सलामी होताच मंदिरात जायला निघते पालखी बालदत्ता जवळ क्षणभर थांबते व नैवेद्याच्या पूर्ण पानांन ओवाळणी होते आणि उत्सव मूर्ती गाभाऱ्यात जाते कापूर आरती शंख तीर्थ व शेजारती होऊन रथाची सांगता



होते.

अशाप्रकारे महालक्ष्मी मंदिरात वर्षभरामध्ये धार्मिक व नैसर्गिक सण उत्सव साजरे केले जातात हे सण उत्सव कोल्हापूरच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रतीक असून महालक्ष्मी मंदिराला खूप महत्त्व आहे.




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण -3

## महालक्ष्मी मंदिराची वैशिष्ट्ये अभ्यासणे

भारतीय स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराची बांधणी कधी झाली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही मात्र सापडलेल्या पाचव्या, सहाव्या शतकातील शिलालेखात या मंदिराचा उल्लेख असल्याने त्या काळाच्या राजवटीत या मंदिराची उभारणी झाल्याचा निष्कर्ष काढला जातो विस्तीर्ण जागेतील ही वस्तू पश्चिमा भिमुख असून त्याच्या बांधकामासाठी रंकाळा खाणितील दगडांचा वापर केला गेला आहे साऱ्या मंदिराच्या बांधकामात हवा प्रकाशाचा मेळ साधण्यासाठी योग्य दिशेचा अभ्यास केल्याची दिसून येते. तसेच राजकीय स्थित्यंतरात आलेल्या राजकर्त्यांच्या काळात या मंदिराची पुनर्रचना झाली आहे. महालक्ष्मी मंदिराचे बांधकाम काळ्या -निळसर दगडाचे आहे आणि त्याच्या सभोवताली भव्य दगडी उभारलेली असून त्याच्या चारही बाजूस भले मोठे प्रवेशद्वार असल्याने येथे येणे- जाणे सोयीचे आहे त्यातील पश्चिमेकडील दरवाजास महाद्वार तर उत्तर दरवाजेस म्हणजे घाटी दरवाजा म्हणून ओळखले जाते उर्वरित दरवाजे पूर्व तसेच दक्षिण दिशेला आहेत कोणत्याही दरवाजाने प्रवेश केल्यावर मंदिर सभोवतालच्या चौफेर रांगणा आपण येतो.

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)




मंदिराचा बाहेरील भाग मूळ मंदिर उभारणीनंतर जोडला असला तरी मंदिरातील गर्भ ग्रह आणि सभामंडप प्राचीन काळाचे आहेत तसे देवालयाची रचना तीन गाभाऱ्यात विभागले आहे सुमारे 26,000 चौरस फूट क्षेत्रावरील मंदिर जमिनीपासून तसे उंचावर आहे सर्व मंदिर वास्तु जागोजागी उत्कृष्ट शिल्पकलेचा अविष्कार आपल्या नजरेत भारावणारा आहे भक्कम काळ्या पाषाणाच्या अनेक खेळांवर शिल्पकाम, नक्षीकाम करून मंदिराचे सौंदर्य खुलवले आहे देवळाच्या भिंतीवर नर्तकी ,वाद्य वाजवणाऱ्या स्त्रिया, मृदुंग, टाळकरी ,विनावादी आरसा देखील, यक्ष, अप्सरा, युद्धे व किन्नर कोरलेले आहेत माघ युद्ध पंचमीला सूर्यास्ताचे किरण बरोबर देवीच्या मुखावर पडतील असे उत्तम द्विज साधन जोडी -घडीव दगडी बांधकाम व नक्षत्रावर अनेक कोणाचा पाया ही मंदिराची वास्तु वैशिष्ट्ये आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण- 4


## मंदिराच्या वस्तू स्थापत्य कलेचा इतिहास अभ्यासणे

कोल्हापूर मधील महालक्ष्मीचे मंदिर पश्चिमाभिमुख असून महाद्वार पश्चिमेकडे आहे पारंपारिक मराठा शैलीचा, लाकडी सुरुच्या खांबांचा व एस पी दर कमानी असलेला सभामंडप प्रवेश केल्यावर दिसतो गेल्या दहा शतकात मंदिराची अनेकदा वाढ झाली. मंदिराचे चार महत्त्वाचे भाग आहेत ते म्हणजे पूर्व भागातील गाभारा व रंग मंडप हा सर्वात पुरातन भाग आहे देवीचा गाभारा येथेच आहे उत्तरेकडे महाकालीचा गाभारा तर दक्षिणेकडे महा सरस्वतीचा गाभारा असून या तीन अंगांना जोडणाऱ्या सभामंडपास महाना मंडप असे नामांतर आहे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठे बरोबर मंदिरास ही देव पण येते म्हणूनच देवाची डाग डुजी किंवा वाढ करणे समत असले तरी कोणताही भाग काढून टाकणे किंवा पाडणे मान्य नाही त्यामुळे जुन्या देवळांची मोठी वाढ झालेली दिसते चैत्र पौर्णिमेच्या वेळी एका मागे एक अशा चढत जाणाऱ्या व दिपानी पाजळेल्या तीन शिखरांचा देखावा अवर्णनीय दिसतो देवळाच्या भिंतीवर नर्तकी,वाद्य वाजवणाऱ्या स्त्रिया, मृदुंग टाळकरी, विनावादी, आरसा देखी अप्सरा, यक्ष, युद्ध व किन्नर कोरलेले आहेत माघ शुद्ध पंचमीला सूर्यास्ताचे किरण बरोबर देवीच्या मुखावर पडतील असे उत्तम दिग साधन विना चुन्याचे जोडी दगडी बांधकाम व नक्षत्रावर अनेक कोनांचा पाया ही मंदिराची वास्तू वैशिष्ट्ये आहेत. देवळाच्या प्रकारात शेषशायी, दत्तात्रेय, विष्णू , गणपती वगैरे अनेक देवतांचे देवळी आणि काशी व मणिकर्णिका कुंड आहे देवळाच्या निरनिराळ्या भागात चार देवनागरी शिलालेख कोरलेले दिसतात दत्त मंदिराच्या पाठीमागे असलेल्या



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

हरिहरेश्वरच्या मंदिराच्या भिंतीवर शके 1140 मध्ये कोरलेला एक शिलालेख आहे दुसऱ्या शिलालेख देवळाच्या पटांगणात प्रवेश करताना डाव्या बाजूला असलेल्या एका खांबावर असून तो शके 1158 चा आहे तिसरा शिलालेख मुख्य देवळाच्या डाव्या बाजूला असलेल्या नवग्रहांच्या छोट्या देवळातील एका खांबावर आहे चौथा शिलालेख मुख्य देवळाच्या पाठीमागे असलेल्या शेषशायी मंदिराच्या डाव्या बाजूला आहे हा शिराढेक आपल्या पूर्वेकडे असलेल्या दरवाजामधून प्रवेश करताना दिसतो.






VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

*** मूर्तीची वैशिष्ट्ये :** महालक्ष्मी मंदिरातील देवीची मूर्ती काळ्या दगडावर कोरलेली असून चार हात इतकी उंच आणि तीन फुटाची असून चौकोनी आहे . देवीच्या गळ्यामध्ये भरगच्च दागिने मडवलेले आहेत 40 kg वजनाचे डोक्यावर मुकुट आहे मंदिराच्या एका भिंतीत दगडावर वेगवेगळ्या छोट्या छोट्या मुर्त्या आहेत देवीच्या मूर्ती मागे देवीचे वाहन सिंहाची प्रतिमा आहे देवीच्या चार हातात वेगवेगळे आयुधे धारण केलेली आहेत मंदिराच्या गाभाऱ्यात दगडी चाबूत खरं दहा खाब असणाऱ्या मेघडं भरात करवीर निवासिनी अर्थात श्री महालक्ष्मी जगदंबेची मूर्ती आहे कोल्हापूर शहराच्या मध्यभागी वसलेले तीन गर्भ गृह असलेले पश्चिम मुखी हेमाडपंती मंदिराची उभारणी आहे या महालक्ष्मी मंदिरामध्ये चारही बाजूने प्रवेश करता येतो आणि महादेवाचे प्रवेश केल्यावर देवीचे मुख्य दर्शन होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# निष्कर्ष :

महालक्ष्मी मंदिर हे कोल्हापूरच्या नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवनातील महत्त्वाचे शक्तिपीठ म्हणून नावा रूपास आहे त्याचबरोबर या शक्ती पीठाने आर्थिक व पर्यटनाच्या दृष्टीने आणि समाजाच्या दृष्टीने कोल्हापूरच्या विकासास महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे दरवर्षी कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात लाखो पर्यटकांच्या भेटीमुळे कोल्हापूरमध्ये विविध रोजगार निर्मिती झाली यामुळे आर्थिक पर्यटनाच्या विकासाला चालना मिळाली. याचबरोबर पर्यटकानासाठी विविध सोई सुविधा निर्माण झाल्या मुळे कोल्हापूरचा विकास होण्यास मदत झाली आहे यामुळे महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर नव्हे तर महाराष्ट्रातील मुख्य धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक पर्यटन स्थळ बनले आहे जय महालक्ष्मी मंदिरामध्ये एका शिलालेखावरून संपूर्ण मंदिराच्या इतिहासाचा उलघडा होतो त्याच बरोबर मंदिरावरील शिल्पाकृती ही आकर्षक दृष्टिकोनातून समोर आली आहे एकंदरीत कोल्हापूरच्या धार्मिक पर्यटनास महालक्ष्मी मंदिरामुळे चालना मिळाली मंदिराच्या खऱ्या इतिहासाचे रूप पाहण्यास मिळते ऐतिहासिक व संस्कृती भूमिका पार पाडली आहे याचे कारण असे की मंदिराचा अभ्यास करण्यासाठी येणारे संशोधक, हावशी कलाकार , शिल्पकार, स्थापत्यकार, मंदिर अभ्यासक, श्रद्धाळू लोक आणि पर्यटक या लोकांमुळे कोल्हापूरमध्ये महालक्ष्मी मंदिराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले यातून कोल्हापूरच्या सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली असे दिसून येते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## संदर्भसूची :


1) कुलकर्णी दा.वि. वरप्रदायिनी महालक्ष्मी , महालक्ष्मी प्रकाशन कोल्हापूर .

2) ढेरे रा .ची. करवीर निवासिनी महालक्ष्मी, पद्म गंगा प्रकाशन, प्रथम आवृत्ती .

3) ढरे रा .ची. आज्ञापत्र, पद्म गंधा प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती 2005

4) देगलूरकर, ( डॉ ) गो.ब.व इतर (संपा) युगयुगीन करवीर इतिहास दर्शन भारतीय इतिहास संकलन समिती ,कोल्हापूर2010

5) दस्ताने संतोष, महाराष्ट्र 2001 दस्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे,2001

6) देसाई (डॉ) सुभाष, कोल्हापूरच्या चित्र- शिल्प परंपरेचा 150 वर्षाचा इतिहास शिवाजी विद्यापीठ ,प्रथम आवृत्ती कोल्हापूर,2007

7) देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र (संपा)माझं कुलदैवत कोल्हापूर 2005



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# मुलाखत

नाव: सुशांत जालिंदर पाटील

लिंग: पुरुष

वय: 37

पत्ता: 520 इ वार्ड मगदूम

कॉलनी गुजरी रोड,कोल्हापूर

## प्रश्नावली

□महालक्ष्मी मंदिरात कधीपासून येण्यास सुरुवात केली?

→ महालक्ष्मी मंदिरा मध्ये मी 5 ते 7 वर्षा पासुन येत आहे कारण मंदिराच्या परिसरा मधील वातावरण खुप भक्ती मय व प्रसन्न आहे त्यामुळे मनाला शांती मिळते आणि मन प्रसन्न राहते.

मंदिरातील पूर्वीची स्थिती व आत्ताची स्थिती यातील फरक काय आहे?

→ मंदिराच्या पुर्वीच्या स्थिती व आत्ताच्या स्थिती मध्ये फारसा काही बदल दिसुन येत नाही. कारण जेव्हा पासुन मंदिराची स्थापना झाली आहे तेव्हा पासुन मंदिर भक्कम स्थीतीत अजुन ही आहे.

मंदिराची स्वच्छता कशाप्रकारे केली जाते?

→ मंदिराची स्वच्छता ही नियमीत केली जाते मंदिर सकाळी 5.30 उघडले जाते त्यानंतर मंदिराच्या स्वच्छतेस सुरुवात केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला काम वाटुन दिले जाते.

नवरात्र उत्सवामधील महालक्ष्मी मंदिराचे एकंदरीत महत्त्व कसे आहे?


→ नवरात्र उत्सवामध्ये भावीकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते लोकांच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा लागलेल्या असतात. त्यामुळे नवरात्र उत्सवा-मधील महालक्ष्मी मंदिराचे महत्त्व खुप आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

मंदिरामधील आणि आजूबाजूच्या परिसरातील लोक मदत करतात का?

→ हो आजुबाजुच्या परिसरातील लोक मदत करत असतात त्याच बरोबर मंदिराच्या देखभाली साठी जे लोक देवस्थान समितीने नेमलेले आहेत ते ही मोठ्या प्रमाणात हातभार लावतात.




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964

# परिशिष्ट








VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी........ओंकार महादेव पाटील............ ...2022-23... सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प ........श्री............ ..................महालक्ष्मी टेम्पल प्रकल्प हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून , आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:** 4/5/ २०२३

**ठिकाण:** कोल्हापूर

डॉ. एस . आर. कट्टीमनी

**HEAD**
**DEPARTMENT OF HISTORY**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**
**(AUTONOMOUS)**

प्रा.अश्विनी खवळे

प्रा. नम्रता ढाळे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964